नि.फौ.ख.क्र. २८०/२०१७

सरकार –वि– संतोष वाघमारे

नि.क्र. १५

**<u>नि.क्र.१५ वरुन साक्षीदार क्र. ३ चा उर्वरित सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. व्ही. इंगळे, यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

३. आज मला कॅन दाखविली तर मी ओळखु शकते. आता मला एक प्लास्टीकची कॅन दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्याला **<u>वस्तुचिन्ह–अ</u>** देण्यात येते. आता मला एक साडी, पेटीकोट, ब्रेशीअर, रुमाल, ब्लाऊज दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यांना संयुक्तपणे **<u>वस्तुचिन्ह–ब</u>** देण्यात येते. साडी, पेटीकोट, ब्रेशीअर, रुमाल व ब्लाऊज तसेच कॅन पोलीसांनी माझ्याकडूनच जप्त केले होते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.१९</u>** देण्यात येते. रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांनी मला शेगाव येथील सरकारी रुग्णालयात नेले होते. शेगाव येथील सरकारी रुग्णालयात माझी प्रकृती गंभीर झाल्याने मला तेथून अकोला येथील शासकीय रुग्णालयात नेले. अकोला येथील सरकारी रुग्णालयात मी अंदाजे चार पाच दिवस उपचार घेतला. ज्यावेळेस मला दोन्ही रुग्णालयात नेण्यात आले त्यावेळेस माझ्या सोबत माझे आई वडील व बहीण व जावाई हजर होते. मी आरोपीला ओळखते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. आरोपीने माझ्या अंगावर रॅाकेल टाकण्याचा उद्देश हा मला जाळून टाकण्याचा होता.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीचा नि.क्र.१८ वरील पुढील तारीख मिळण्याचा अर्ज नामंजुर करण्यात आलेला आहे. आरोपीचे विधीज्ञ गैरहजर. आरोपीने साक्षीदाराला विचारायचे असल्याचे सांगितल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे. आरोपीने न्यायालयासमक्ष कथन केले की, या व्यतिरिक्त मला काही विचारायचे नाही.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१४.११.२०२५ | दि.१४.११.२०२५ |